# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. एस. एम. रोकडे) क्रमांक/महा.वि/गो.वि./6070 /२०१६

संचालक (प्रभारी) दिनांक : ०५/०३/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,

सर्व संलग्नित महाविद्यालये

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— भारत पाक युध्दाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत— प्रा. द. ज. पाखेडे

संदर्भ:—१) मा. अवर सचिव, उ. व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई शासनाचे पत्र क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. ८४२/विशि—३ दि. १०.२.२०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, भारत पाक युध्दाच्या सूवर्ण महोत्सवी वर्षनिमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत तसेच प्रत्येक विद्यापीठात संरक्षण विषयक सर्व अंगांचा अभ्यास अनिवार्य करण्यात पुढाकार घेण्याची विनंती पत्रानुसार केलेली आहे.

याबाबत कार्यवाही करून संबंधीत अहवाल विद्यापीठास तात्काळ पाठविण्यात यावा जेणे करून मा. शिक्षण संचालनालय, पुणे यांना कळविणे सोईचे होईल

संलग्नित:— वरिलप्रमाणे

(डॉ. एस. एम. रोकडे)

संचालक (प्रभारी)

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतीलिपी:—

मा. श्री. सतिश माळी, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई—४०० ०३२, माहितीकरिता अग्रेषित

मुख्यमंत्री कार्यालय
हैद्राबाद हाऊस, नागपूर
दिनांक: 19/09/2015

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र. मुख्यमंत्री. 3658

प्रति,

मा. उपसचिव
मुख्यमंत्री कार्यालय,
मंत्रालय मुंबई — ३२

मुख्यमंत्री सचिवालय
24 SEP 2015
1264210
ई-टपाल मुमंस..................

**विषय:** सरकारने विशेष कार्यक्रमांचे आयोजन करून तरूणांना [illegible] मुघलांच्या स्मृती जागृत करण्यास प्रयत्न करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचा अर्जदार **द.ज. पाचखेडे** यांचा या कार्यालयास प्राप्त झालेला मुळ अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे यासोबत आपणाकडे सादर करण्यात येत आहे.

सदर अर्जावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही व्हावी. केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास परस्पर कळवावे. हि विनंती.

सहपत्र : वरीलप्रमाणे

**आपली विश्वासु**

**(आशा पठाण)**
**विशेष कार्य अधिकारी**

अ.स. (सा.प्र.वि.) योग्य ती कार्यवाही करावी अर्जदारास उत्तर द्यावे.

प्रत : द.ज. पाचखेडे, ५४, राधानारायाण, पांडे ले आऊट, खामला, नागपूर —

**(कैलास शिंदे)** २५
**उप सचिव**
**मुख्यमंत्री सचिवालय**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**

||Shri Balaji Prasanna||

Moblie No. 9850051752

**D.J. PACHKHEDE**
(RTD)
54, Radhanarayan
Pande Layout,
Khamla, NAGPUR-25

Date:______________

मा. देवेंद्र फडणवीस
मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

2015 हे 1965 च्या भारत पाक युद्धाचे सुवर्ण महोत्सवी वर्षअसल्या कारणाने सरकारने विशेष कार्यक्रमांचे आयोजन करून तरूणांना त्या युद्धाच्या स्मृती जागृत करण्यास आपण प्रयत्न करावे हि विनंती.

धन्यवाद

विनित

विनित
द. ज. पाचखेडे
(प्रा. द.ज. पाचखेडे)

दिव्यत्वाची जेथ प्रचिती
1965 – 2015
भारत –पाक युद्धाचा सुवर्ण महोत्सव

15 ऑगस्ट 1947 ला इंग्रजांच्या राजवटीतून भारत स्वतंत्र्य झाला. यानंतर काश्मिर मध्ये छुटपुट हल्ले सुरूच होते. मात्र स्वतंत्र भारतावर 20 ऑक्टोबर 1962 ला चीनने आक्रमण करून संपूर्ण देशाला हादरवून सोडले. देश खडबडून जागा झाला. पं. जवाहरलाल नेहरू पंतप्रधानाची धुरा सांभाळीत होते. भारतीय सैन्याची ताकद सर्वजगाने ओळखली. शूर जवानांनी आणि अधिकाऱ्यांनी प्राणांची आहुती देवुन देशाची सुरक्षा करून सीमेवर जागता पहारा दिला. तरी सुद्धा चीनचे छुपे हल्ले आजही सुरूच असून चीनने भारतात घुसण्यासाठी आता बरीच मजल मारली आहे.

2 एप्रिल 1965 ला पाकिस्तानने छोटे मोठे हल्ले करून भारतीय जवानांना सावध केले, सीमेपलीकडुन येणारा प्रत्येक हल्ला परतवून लावण्यात भारतीय जवान यशस्वी होत होते. तरी परंतु पाक सैन्याची खुमखुमी काही कमी होत नव्हती. अखेर 5 ऑगस्ट 1965 ला पाकिस्तान – भारत यांच्यातील निर्णायक युद्धाला प्रारंभ झाला आणि तब्बल 25 – 30 दिवस झालेल्या तोफगोळयांचा आवाज 22 सप्टेंबर 1965 ला शांत झाला. स्वर्गीय लाल बहादुर शास्त्री तत्कालीन पंतप्रधान होते.

1971 च्या भारत – बांगला युद्धाचे वेळी स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना बांगला देश स्वतंत्र करण्यात मोठी अहम भूमिका बजावली होती. सैनिकांनी आपला पराक्रम व ताकद दाखवून विजय संपादन केला होता.

या तीनही युद्धात भारतीय सैनिकांनी दैदिप्यमान कामगिरीने व शत्रुला धुडकावून लावल्याने भारताची मान उंचावल्या गेली. 1962 व 1971 या दोन्ही युद्धांच्या स्मृतींना दरवर्षी उजाळा देण्यात येतो. 1962 च्या युद्धाचा सुवर्ण महोत्सव तत्कालीन भारत सरकारने मोठया जोशाने व उत्साहात साजरा केला. 1962 च्या युद्धाचे चिर स्मरणीय "ये मेरे वतन के लोगो" हे गीत जवानांना व तरूणांना प्रेरणा दायक आहे.

भारत सरकार दरवर्षी कारगील विजय साजरा करीत असतो. सैन्याचे मनोबल वाढविणे व आजच्या तरूणांना सैनिकांनी केलेल्या कामगिरीची आठवण करून देण्याचे फार मोठे कार्य सरकार व सैन्य सतत करीत असते. तरूणांनी सैन्यात भरती होऊन भारताच्या

सीमांचे रक्षण करण्याकरता व भारत मातेची सेवा करण्याकरता आवाहन सरकार करीत असते. कारगील युद्धाचे वेळी मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते.

1965 च्या भारत – पाक युद्धात भारतीय सैन्य लाहोर – कराची भागापर्यंत घुसून पाकी सैन्याचे मनोबल खच्ची करण्यात यशस्वी झाले होते " अब एकही नारा है पाकिस्तान हमारा है" – " एक धक्का और दो – पाकिस्तान ले लो " या नाऱ्याच्या गर्जनेने भारत पेटून उठला होता. भारतीय सैन्याचे मनोबल उंचावून त्यांचे धैर्य वाढविणे ही त्या काळाची गरज होती. भारतीय नागरिकांनी सीमेवर लढणाऱ्या कुटुंबियांची जबाबदारीही सांभाळली होती.

देशात अनेक ठिकाणी स्वयंस्फूर्तीने पेट्रोलिंग ( रात्रीची गस्त) सुरू होती निरनिराळया ठिकाणी व मोठया शहरात पोलीसांच्या मदतीने रस्त्यावरील वाहतुक नियंत्रणाचे मोठे काम 'स्वयंसेवी संघटनांनी' केले ही फार मोठी उपलब्धी, या घटनाक्रमाने देशभक्तांनी आम्ही ही देशाच्या संरक्षणात मागे नाही हे दाखवून दिले.

तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्रींनी भारतातील राजकीय नेत्यांबरोबरच सामाजिक संघटना व देशभक्तीची जाणीव करून देणाऱ्या नेत्यांना /पुढाऱ्यांना एकत्र करून देशात एकजुटीचे वातावरण निर्माण केले संपूर्ण देशाला विश्वासात घेतले " जय जवान जय किसान" हा नारा देवुन या कृषि प्रधान देशातील शेतकरी बांधवही सैन्याच्या पाठिशी उभे राहिले. दर सोमवारी उपवास करून जमा झालेले धान्य सैनिकांच्या कुटुंबियाकरता राखून ठेवले ' मूर्ती लहान पण किर्ती महान' म्हणून ज्यांची ख्याती होती त्या आपल्या लाल बहादूर शास्त्रीनी सर्व देशाला एका छत्राखाली आणले.

जमिनीवर सैन्याच्या बलिदानाने सीमांचे रक्षण करता करता आहुती देणाऱ्यांनी भारताला मोठा विजय मिळवून दिला होता पण राजकीय कुटीलकारस्थानाच्या दबावामुळे रशियातील ताश्कंदयेथे झालेल्या करारामुळे जमिनीवर जिंकलेले युद्ध कागदावरील सह्यांमुळे गमावुन बसावे लागले " आमच्या भारत मातेचा लाल – बहादूर ठरला पण शास्त्री गमावला" गड आला पण सिंह गेला. (शास्त्रींचा मृतदेह परत आला )

वरील विवेचन याकरता की भारत पाक युद्धातील दैदिप्यमान विजयाचे 2015 हे सुवर्ण महोत्सवाचे वर्ष असल्याने या सुवर्णसंधीची आठवण भारतातील आबालवृद्धांना व्हावी व त्या तेजस्वी सुवर्णक्षणाचे दर्शन विविध मार्गाने तरूण पिढिला व्हावे या साठी या सुवर्ण महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे. तरूणाईला भारतीय सैनिकाच्या सामर्थ्याचे स्मरण व्हावे

व त्याकाळात घडलेल्या अनेक गोष्टिंचे प्रदर्शन भरवून शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची एक 'सुवर्णसंधी' ग्रामपंचायती पासुन ते राज्य व राष्ट्राने स्विकारावी.

ये मेरे वतन के लोगो । जरा आख मे भर लो पानी ।
ज्यो शहिद हुये है । उनकी याद करो कुर्बानी ।।

विदेशात युद्धाची स्मृती रहावी म्हणून युद्ध स्मारकांची उभारणी केली आहे. रस्त्यांना सुद्धा शहीदांचे नाव देवून त्यांचे स्मरण करून प्रेरणा घेण्याची स्फूर्ती मिळते. भारताच्या राजधानीत दिल्लीत परदेशी पाहुणे येत असतात प्रथम् आगमन झाल्यानंतर प्रातःस्मरणीय महात्म गांधीना श्रद्धांजली वाहण्याकरता राजघाटावर जावुन पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धा सुमने वाहिली जातात. या युद्धात शहीद झालेल्यांच्या स्मृती प्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या 'अमर जवान ज्योत' वर श्रद्धा सुमने अर्पित करण्याकरता विदेशी पाहुण्यांना नेण्यात यावे.

भारतातील मान्यवर राष्ट्रपति, उपराष्ट्रप्रति व पंतप्रधान याच्या विदेश दौऱ्यात युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यास प्राधान्य दिल्या जाते. आपल्याकडे हे का होवु नये ? राजकीय नेत्यांचा सन्मान आधि व नंतर शहीदांची स्मृती.

नागपूरच्या झेंडा चौकात (चिटणीसपुरा) शहीद शंकर महाले या शहीदाचा पुतळा आहे. पण एकाही शैक्षणीक संस्थेला शहीद शंकर महाले यांचे नाव देण्याची दृष्टी नाही. या पुतळयाच्या जवळ नागपूर महानगर पालिकेची प्राथमिक शाळा आहे. ती शाळा शंकरराव फाटे यांचे जागेवर असल्याने त्या शाळेचे नामकरण करून शंकरराव फाटे महानगर पालिका प्राथमिक शाळा असे करण्यात आले. त्या शाळेला शहीद शकर महाले यांचे नाव देण्याचे साधे सौज्यन्यही नागपूर महानगरपालिकेला दाखविता आले नाही.

नागपूरातील काही उद्यानांना युद्धात बलिदान झालेल्या शहीदांची नावे देवुन त्यांची स्मृती कायम ठेवुन त्यांचा मरणोपरांत गौरव करण्यात आला. जसे मेजर आनंद खरे व मेजर सुरेंद्र देव उद्यान.

कविवर्य बोरकर यानी म्हटल्याप्रमाणे " परिजयाच्या दहनभूमीवर नाही चिरा नाही पणती तेथे कर माझे जुळती" या काव्यपंक्ती नुसार असे अनेक अज्ञात शहीद आहेत की भारतीय युद्धात आपले प्राण गमावून बलिदान दिले. त्यांचे साधे युद्ध स्मारकही भारताच्या राजधानीतच काय पण प्रांताच्या राजधानीतही नसावे.

महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रहमान अंतुले यांनी स्वातंत्र्य संग्रामात ज्यांचे बलिदान झाले त्यांचे तालुकास्तरापासुन शहीद स्मारक उभी केलीत या स्वातंत्र्यलढयात ज्यांचे बलिदान झाले ते "स्वातंत्र्याचे संरक्षकच " आहेत.

आजही भारतीय सैन्यातील तीनही ~~सदनात~~ सेन्य दलात अनेक जागा रिक्त असून तरूणाईला सैन्यात भरती होण्याकरता आकर्षित करण्यात शासन प्रयत्नशील आहे. (सैन्यात 15000 अधिकारी व एक लाख सैनिकांची कमतरता आहे)

1965 भारत पाक युद्धाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने ज्या दिवशी विजय मिळविण्यात भारतीय जवान यशस्वी झाले तो " राष्ट्रिय शौर्य दिवस " म्हणून घोषित करण्यात सरकारने पुढाकार घ्यावा.

सर्व प्रिंट मिडिया व इलेक्ट्रॉनिक मिडियाने त्या काळात घडलेल्या घटनांचे छाया चित्रासहीत वृत्त सरकारी वृत्त वहिन्यांनी प्रसारण करावे. काही खाजगी वृत्त वाहिन्याही हे काम देशहीत समोर ठेवून करतातच.

सरंक्षक विषयावर विविधांगानी परिसंवाद चर्चासत्र वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करण्यात यावे. या युद्धात प्रत्यक्ष सैनिक व अधिकारी ज्यांनी मोलाची कामगिरी केली त्यांचे प्रत्यक्ष अनुभव कथन ऐकविण्यात यावे.

स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांच्या गावात असलेल्या सैनिकांचा गौरव करून सम्मेलन व सत्कार करावा.

भारतातील प्रत्येक विद्यापीठात सरंक्षण विषयक सर्व अंगांचा अभ्यास अनिवार्य करावा पुढे पदव्युत्तर अभ्यास क्रमाचीही व्यवस्था करण्यात विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. ( पुणे विद्यापीठात या संबधीचा पदव्युत्तर अभ्यासक्रम आजही चालविला जातो.)

राष्ट्रिय चेतना जागविण्याकरता शाळा महाविद्यालये, पोलीस होमगार्ड सैनिकांनी आणि स्वयंसेवी संघटनांनी आपल्या घोष पथकासह (Band Unit ) शहराच्या निरनिराळया भागात Route March (पथ संचलन) आयोजित करावेत.

शेवटी काव्य पंक्तीच्या ओळीने त्या शहीदांना ज्यांनी 1965 च्या युद्धात बलिदान केले त्यांना श्रद्धांजली च्या चार ओळी –

" यज्ञी ज्यांनी देवुनी निजशिरा।
घडवले मानवतेचे मंदिर।।
परिजयांच्या दहन भूमीवर।
नही चिरा नाही पणती ।।
तेथे कर माझे जुळती"

87